

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना - NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ४२ वे | अंक ८ वा | १० जानेवारी २०२१ | किंमत १ रुपया

चित्तपावन ब्राह्मण संघाच्या वतीने
सर्व सभासद बंधू-भगिनी, जाहिरातदार, हितचिंतक
यांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

नववर्ष 2021

## श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था व टकले बंधू यांच्या संयुक्त विद्यमाने

## सुवर्ण संचय समृद्धी योजना

बघता बघता वर्ष-दोन वर्षावर मुला मुलींचं लग्न येऊन ठेपलं आहे!
गुंतवणुकीचा उत्तम व खात्रीशीर पर्याय शोधत आहात ?
सोने खरेदी करायचे आहे? शेअर मार्केट धक्के देतंय?
पण महागाई व वाढत्या भावामुळे शक्य होत नाहिये?

**थांबा, काळजी करू नका,**
**आपली ही काळजी दूर झाली आहे.**

तुमच्या सोयीने हवे तेवढे सोने आजच खरेदी करा.
ते पण सोन्याच्या आजच्या भावाच्या फक्त २५% रक्कम भरून. उर्वरित रकमेची सुलभ मासिक हप्त्यांमध्ये एका वर्षात परतफेड करा.
लग्नात लागणारी अपरिहार्य गोष्ट किंवा वर्षानुवर्षांपासून सिद्ध झालेला उत्तम गुंतवणुकीचा पर्याय म्हणून देखील सोने हाच पर्याय आहे.



अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.

**श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था**
फोन : (०२५३) २३१३७०९/ ९१६८४२६८८८

**टकले बंधू, सराफ बाजार**
फोन : ०२५३-२५९४१५४, २५९६६५४, २५९९०५४

विचार कसला करताय, येताय ना मग !

# मधुकर बापट



आपल्या चित्तपावन उद्योजकमंचातील ज्येष्ठ सदस्य मधुकर बापट यांचा ५ डिसेंबर २०२० रोजी दुर्दैवी मृत्यू झाला. नाशिकमधील सर्व चित्तपावन उद्योजकांना एकत्र आणून त्यांचा एकमेकांशी परिचय व्हावा, संघटन वाढावे या दृष्टीने मधुकाकांनी चित्तपावन उद्योजक मंचाची कल्पना मांडली आणि ती प्रत्यक्षातही आणली. अनेक नामवंत संस्थांच्या स्थापनेपासून ती संस्था मोठी करण्याचा दांडगा अनुभव मधुकाकांना असल्याने उद्योजकमंचाची कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचे काम त्यांनी मोठ्या तळमळीने आणि फार मनापासून केले. एकमेकांचा संपर्क असल्याशिवाय उद्योजक मोठा होऊ शकत नाही. ही दृढ कल्पना त्यांनी प्रत्येक चित्तपावन उद्योजकांच्या मनात रुजवली त्यामुळे सातत्याने आठ, दहा वर्षे भारतातूनच नव्हे तर परदेशातूनही नामांकित चित्तपावन उद्योजक, अर्थतज्ज्ञ, मोठ्या मल्टिनॅशनल कंपन्यांमधील पदाधिकारी यांना निमंत्रित करून अत्यंत देखणे कार्यक्रम आखले. कार्यक्रम आखताना नवोदितांना सतत पाठिंबा प्रोत्साहन त्यांनी दिले. लिडर कसा असावा याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे मधुकाका बापट होय. अतिशय मनमिळावू, मितभाषी,सदैव उत्साही असणारे हे व्यक्तिमत्व, कोणत्याही पदाची अभिलाषा त्यांना कधीच नव्हती, फक्त कार्य करीत रहाणं, आपल्या परीने समाजात जिथे जिथे मदतीची गरज आहे तिथे तिथे धाऊन जाणे हा त्यांचा स्वभाव होता.सामाजिक कार्याची आवड आणि प्रत्येकाला बरोबर घेऊन सदैव हसतमुखाने काम करीत रहाणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. जन्माने नाशिककर असलेले मधुकाका शालेय शिक्षणानंतर इंजिनिअरिंग डिप्लोमा करण्यासाठी अमरावतीला गेले. नंतर कऱ्हाड येथून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त करून १९८० च्या सुमारास नाशिकला परत आले. काही दिवस मुंबई येथे L&T मध्ये काम केल्यावर नाशिकला मायको मध्ये काम करू लागले.१९८५ मध्ये स्वतःचा फॅब्रिकेशनचा व्यवसाय सुरू केला. व्यवसायातील प्रत्येकाशी स्वतःच्या कुटुंबातील सदस्यासारखे त्यांचे संबध होते. याच अनुभवाच्या जोरावर ते नव्या उद्योजकांना सतत मदत करीत असत.याच सगळ्याचा उपयोग उद्योजक मंचातील उद्योजकांना संघटित करण्यासाठी त्यांनी सदैव केला. रक्तातच समाजकार्याची आवड असल्याने नाशिकमधील अनेक संस्थांमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग अगदी अखंड होता. जगन्मित्र ज्याला म्हणता येईल असे हे व्यक्तिमत्व होते. एकत्र कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती ही भूमिका त्यांनी आयुष्यभर सांभाळली. तीच भूमिका त्याच ज्येष्ठत्वाने त्यांनी प्रत्येक संस्थेतही सांभाळली. त्यांच्या अशा अकाली आणि अनपेक्षित मृत्यूने कदाचित नाशिकमधील प्रत्येक व्यक्ती हळहळली असेल. नाशिक फर्स्ट या संस्थेमधून वाहतुकीला शिस्त लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या मधुकाकांचा अपघाती मृत्यू कोणाच्या तरी बेशिस्तीमुळे व्हावा यापेक्षा दुर्दैवी घटना असू शकत नाही. त्यामुळेच आपल्यातल्या प्रत्येकाने स्वतःबरोबरच जवळच्या प्रत्येक माणसाला वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे धडे द्यावेत. मधुकाका बापट यांना हीच खरी श्रध्दांजली ठरेल. चित्तपावन उद्योजक मंच, चित्तपावन संघ,नाशिक या सर्वांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली, त्यांच्या कुटुंबियांना या दुःखद प्रसंगाला धीराने सामोरे जाण्याची शक्ती परमेश्वर देवो. मधुकाकांच्या नावाआधी कै शब्द लिहिणे फार अवघड आहे. पण आपल्या प्रत्येकाच्या मनात ते सदैव जिवंतच असणार आहेत.

**–चित्तपावन उद्योजक मंच**

* * *

## विज्ञान वारकरी

**विज्ञान वारकरी** संस्था पर्यटनातून संशोधन व संशोधनातून अर्थार्जन ही संकल्पना गेली ७ – ८ वर्षे राबवत आहे. मूलभूत संशोधन म्हणजे नेमकं काय? ते कसे करायचे? त्यातून आपला, पर्यायाने देशाचा आर्थिक विकास कसा होईल याचे पूर्ण Training आम्ही आत्तापर्यंत देत आलो आहोत. यातून काही मुलांचे पेटंट देखील झाले आहेत. यावर्षी Study of Biodiversity, Biomimicry या विषयावर वेगवेगळ्या प्रकारच्या जंगलात आमची विज्ञान वारी सुरू आहे. त्यात ताडोबा, मेळघाट, रणथम्बोर यासारख्या घनदाट जंगलात आतापर्यंत बरेच विद्यार्थी सहभागी झाले आहेत. यात दुर्मिळ वनस्पती, पक्षी, प्राणी यांचा अभ्यास व त्यातून Strong innovative प्रोजेक्ट्सबद्दल training दिले जाणार आहे. यातील निवडक प्रोजेक्ट डॉ. रघुनाथ माशेलकर यांना सादर करण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, व्यक्तींना यात सहभागी व्हावे असे वाटते. त्यांनी श्री रवींद्र शास्त्री, ९०११०१८७४४ या क्रमांकावर संपर्क करावा.

# चांगल्या कामांच्या मागे उभे राहणारे
# मधुकर बापट

कोणतीही व्यक्ती आपल्यातून गेली की समाजाचे कमीअधिक प्रमाणात नुकसान होत असतेच. अशावेळी हे नुकसान भरून येणार नाही असे म्हणण्याची पद्धत आहे. पण नाशिकच्या औद्योगिक आणि सामाजिक जीवनाशी पक्की नाळ जोडली गेलेल्या मधुकर बापट यांच्या, एका लहानशा अपघातात झालेल्या, निधनाने नाशिकच्या समाजजीवनाचे नक्कीच मोठे नुकसान झालेले आहे. प्रारंभी नाशिक आणि नंतर मुंबईमधल्या मोठ्या औद्योगिक संस्थांमध्ये अभियांत्रिकी क्षेत्रात काम केलेले बापट आपल्या मूळ गावी नाशिकला आले आणि त्यांनी इथल्या औद्योगिक वसाहतीत आपला व्यवसाय सुरू केला. त्यात यशस्वी होत असतानाच ते इथल्या उद्योजकांच्या संस्थांमध्ये काम करायला लागले. निमाच्या उत्कर्षाच्या काळात जी उत्कृष्ट टीम जमली होती त्यात मधू बापट हे सर्वांना कनेक्ट करणारे Catalytic Agent होते. स्वत: पडद्याच्या समोर न येता आपल्या टीममधल्या इतरांच्या कामात जे कमी पडत असेल ते बळ कामाच्या पाठमागे उभे करणे हा त्यांचा स्वभाव होता. एका टप्प्यावर स्वत:च्या कारखान्यातून निवृत्ती घेऊन, उद्योगापेक्षाही मोठ्या समाजजीवनात आले. आणि अनेक समाजोपयोगी कामांमध्ये त्यांनी स्वत:ला बापट झोकून दिले. नाशिकमध्ये त्या काळात रक्ताची गरज भागवण्यासाठी जनकल्याण रक्तपेढीची नुकतीच स्थापना झालेली होती. ती वाढवण्यासाठी आणि पुढे स्वत:च्या मोठ्या इमारतीत आणण्यासाठी मधू बापटांनी जिवाचे रान केले. अनेक लहानमोठ्या देणगीदारांकडून देणग्यांचा ओघ त्यांनी जनकल्याण रक्तपेढीकडे वळवला. औद्योगिक जगातल्या अनेक लहानमोठ्या उद्योजकांना त्यांनी ह्या कामाशी जोडले. पुढे हेच त्यांनी श्री गुरुजी रुग्णालयाच्या बाबतीतदेखील घडवले आणि हे करताना वेगवेगळ्या क्षेत्रातल्या अनेकांना एका सूत्रात जोडत असताना स्वतः अलगद मागे होण्याचा अनोखा गुण त्यांच्याकडे होता. निमाच्या कामातून निवृत्त होत बापट आणि त्यांच्या काही मित्रांनी नाशिक फर्स्ट स्थापन केले. केवळ नाशिकच्या हितसंबंधांना प्राधान्य देत वेगवेगळे विषय समाजापुढे आणण्यात नाशिक फर्स्टने महत्वाचे काम केले आहे. कॉर्पोरेट पद्धतीचे व्यावसायिक स्वरूप घेऊन समाजसेवेचे काम करण्याचा हा प्रयोग यशस्वी ठरला. पुढे ह्याच संस्थेच्या माध्यमातून ट्रॅफिक पार्क सारखा अभिनव प्रयोग यशस्वीपणाने राबवणाऱ्या टीममध्ये बापट सहभागी होते. आणि तिथेसुद्धा त्यांची भूमिका त्या प्रयोगाच्या पाठीशी उभे राहून त्याला सर्व प्रकारचे सहाय्य करण्याचीच राहिली होती. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, शंकराचार्य न्यास, गंगापूरचे बालाजी मंदिर, वनवासी कल्याण आश्रम, घरकुल परिवार, चित्तपावन ब्राह्मण संघ अशा अनेक संस्थांशी त्यांचा थेट संबंध होता. हे सगळे करताना ह्या संस्थांच्या पाठीशी उभे राहून त्यांच्याकडे देणग्यांचा ओघ खेचून आणण्यापुरतेच ते सीमीत नव्हते. स्वत:साठी ह्या संस्थांमध्ये कोणत्याही पदामध्ये त्यांना रस नव्हता. पद आणि अधिकारांच्या पलीकडे जाऊन समाजातल्या चांगल्या कामांच्या पाठीशी सर्वशक्तिनिशी उभे राहणे ही त्यांची खासियत होती. मधुकर बापट यांच्या जाण्याने नाशिकमधला सार्वजनिक संस्थांच्या कामात नेहमी मदतीला तयार असलेला हसतमुख , समंजस सहाय्यक मित्र गेला आहे हे नक्की. मधुकर बापट यांना विनम्र श्रद्धांजली.

**–प्रा. दिलीप फडके**

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम,
प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

मिहिर कन्स्ट्रक्शन

सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे**, बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल** : ०९४२२२४६८७८
**ईमेल :** cvranade@gmail.com

# सुखांत जीवनाचा

**लेखक : ॲड. अविनाश जनार्दन भिडे, नाशिक**

चैतन्य एक आय. टी. इंजिनीअर, अतिशय हुशार, मित्रांमध्ये लोकप्रिय, मदत करण्याची त्याची सवय सर्वांनाच आवडायची. मूळचा नागपूरचा पण नोकरी निमित्ताने नाशिक येथे भाड्याने खोली घेऊन राहत होता. कामात अतिशय तल्लख, त्यामुळे ऑफिसमध्येही सर्वांनाच तो हवाहवासा वाटत होता. त्याची हुशारी, मन मोकळा स्वभाव व मिळून मिसळून वागण्याच्या सवयीमुळे त्याचे मित्रमंडळही खूप मोठे झाले होते. नाशिकमध्ये एकटाच रहात असल्यामुळे त्याचा दिनक्रमही ठरलेला होता. सकाळी साडेसहा/सातपर्यंत उठणे, सर्व आवरून साडे नऊपर्यन्त ऑफिस. संध्याकाळी सहानंतर तो मोकळाच असायचा.

एक दिवस सकाळी अचानक त्याचा मित्र निलेशचा त्याला फोन आला. त्याच्या वडिलांना अचानक हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यामुळे तो आज ऑफिसला येणार नव्हता. तसा निरोप त्याने ऑफिसमध्ये द्यायला सांगितला. त्याने त्याच्या वरिष्ठांना फोनवर सांगितलेले आहेच असेही तो म्हणाला. चैतन्यने त्याच्या वडिलांना अचानक काय झाले असे थोड्या काळजीनेच विचारले. निलेश म्हणाला की त्यांना सकाळी चक्कर आली, आता इन्व्हेस्टिगेशन चालू असल्याचे चैतन्यला समजले.

संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर निलेशला फोन करून त्याचे वडील ॲडमिट असलेल्या हॉस्पिटलमध्ये चैतन्य गेला. त्याने भेट घेतली, वडिलांच्या तब्येतीची विचारपूस केली. निलेश फारच काळजीत दिसला. वडिलांना आय.सी.यू. मध्ये ॲडमिट केले असल्याचे बोलला. चैतन्यने परिस्थिती लक्षात घेत निलेशला जरा बरे वाटावे आणि तो थोडा मोकळा व्हावा म्हणून त्याला हॉस्पिटलमधील कॅफेटेरियात घेवून गेला व चहाची ऑर्डर दिली व हळूच निलेशला म्हणाला निलेश, काय झालयं, बाबा बरे आहेत ना?, रिपोर्टस् काय आले आहेत? निलेशचा बांध एकदम फुटला आणि त्याच्या डोळ्यात पाणी आले. चहा पिता पिता त्याने वडिलांना कॅन्सर असल्याचा संशय डॉक्टरांनी बोलून दाखविल्याचे सांगितले पण इन्व्हेस्टिगेशनचे रिपोर्ट आल्याशिवाय नक्की कळणार नाही असे म्हणाला. वडील जरी आय.सी.यू. मध्ये असले तरी सध्या त्याची प्रकृती ठिक आहे. पण डॉक्टरांनी निदान एक रात्र तरी आय.सी.यू. मध्ये ठेवावे असे मत व्यक्त केल्यामुळे तो त्या रात्री तेथेच थांबणार असल्याचे म्हणाला. चैतन्यला वाईट वाटले. घरी तोही एकटाच असल्याचे त्याने पण रात्री हॉस्पिटलमध्ये थांबण्याची तयारी दर्शवली. भरपूर गप्पा मारू, वेळ पटकन निघून जाईल असे चैतन्य म्हणताच निलेशलाही बरे वाटले. रात्री साडेनऊपर्यंत येतो असे सांगून चैतन्य घरी गेला.

घरी गेल्यावर चैतन्यने अंघोळ केली आणि फ्रेश झाला. शेजारच्या बिल्डींगमधील डबेवाल्या काकूंना फोनवरून डबा थोडा उशीरा म्हणजे नऊ वाजता देण्याचा व आज डबा दोन जणांचा देण्याचा निरोप त्याने दिला व रात्री आलेला गरम गरम डबा घेऊन थेट हॉस्पिटल गाठले. निलेशचे वडील शुद्धीत होते, बोलत होते. डॉक्टरांची परवानगी घेऊन चैतन्य एकटाच त्यांना आय.सी.यू. मध्ये भेटायला गेला. लांबूनच त्यांच्याशी बोलला. निलेशला रात्री कंपनी म्हणून चैतन्य आल्याचे त्यांना कळल्यावर त्यांनीही आनंद व्यक्त केला. परंतु त्यांच्या डोळ्यात थोडी काळजी, चिंता डोकावत असल्याचे चैतन्यला जाणवले. त्याने त्यांना आराम करा. आम्ही दोघे बाहेरच आहोत असे हळूच सांगत तो आय.सी.यू. मधून बाहेर आला...


बाहेर निलेश आय.सी.यू. मध्ये असलेल्या पेशंटच्या नातेवाईकांसाठी असलेल्या विश्राम गृहात बसलेला होता व समोरील टि.व्ही. वरील बातम्या बघत होता. चैतन्य त्याच्या जवळच्या खुर्चीत बसला व त्याने सहज आजूबाजूला नजर टाकली तेथे आणखी तीन पुरूष व एक स्त्री बसलेले होते. त्यांच्या जवळ त्यांच्या जुजबी सामानाच्या पिशव्या पायापाशी तसेच शेजारील बाकावर ठेवलेल्या होत्या. चैतन्यच्या लक्षात आले की त्यांचे प्रत्येकाचे कोणीतरी आय.सी.यू. मध्ये ॲडमिट आहे. चैतन्य देखील बातम्यात लक्ष घालायचा प्रयत्न करू लागला पण त्याला निलेशचा अस्वस्थपणा जाणवत होता. निलेश सारखा चुळबुळ करीत होता, उगाच सावरून बसल्यासारखे करत होता. दोन्ही हात एकमेकांवर चोळत होता. चैतन्यने हळूच त्याच्या खांद्यावर हात ठेवला व बातम्यांमधील एक धागा पकडून त्याच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करू लागला. पण निलेश फारसा प्रतिसाद देत नव्हता. चैतन्य व निलेशची ऑफीसमधील ओळख असल्याने त्याला निलेशची घरची परिस्थिती फारशी माहित नव्हती. परंतु निलेश आर्थिकदृष्ट्या चांगला सक्षम असावा असा अंदाज

त्याला होता. वडिलांचे वय काय ? चैतन्यन हळूच निलेशला विचारले. ऐशी असे त्रोटक उत्तर आले. ते काय करीत होते ? चैतन्यने संवाद चालू ठेवण्यासाठी विचारले. निलेशने शांतपणे त्याचे वडील डेप्युटी कलेक्टर म्हणून निवृत्त झाल्याचे सांगितले. निवृत्तीनंतर काय करीत होते ? चैतन्यने पुन्हा निलेशला बोलते करण्याचा प्रयत्न केला. निलेशने पुन्हा प्रतिसाद देत, त्यांचे मित्र मंडळ खूप मोठे असल्याचे सांगत त्यांना सामाजिक कार्याची खुप आवड असल्याचे सांगितले. नंतर निलेश एकदम बोलता झाला, नोकरी करीत असतांना त्याना मनासारखा वेळ सामाजिक कामात देता येत नव्हता, परंतु निवृत्त झाल्यावर, त्यांनी अनेक संस्थांमध्ये त्यांचे नाव नोंदवले व त्यांनी त्या कामात स्वत:ला गुंतवून घेतले. निलेश उत्साहाने बोलायला लागला, दोन/तीन वर्षांपूर्वीच त्यांना एका संस्थेने गौरवल्याचे व त्यांचा सत्कार केल्याचे सांगितले व त्यामुळे त्यांना असे हॉस्पिटलमध्ये तेही आय.सी.यू. त झोपल्याचे बघून त्यांचे सर्वच कुटुंबीय हतबल झाल्याचे तो म्हणाला. इतकेच नाही तर स्वत: वडिलांनीही परावलंबी झाल्याचे, हतबल झाल्याचे एक दोन वेळा बोलून दाखविले असे तो म्हणाला.

नोकरी करतांना व त्यानंतर सुमारे सतरा/अठरा वर्षे सतत कार्यरत असलेले त्याचे वडील अचानक रूग्ण शय्येवर बघून तो अस्वस्थ झाला होता. ते सर्व ऐकून चैतन्यही विचारात पडला.

मनुष्य सतत कार्यरत असेल तर ठिक, परंतु अशा एखाद्या प्रसंगाने तो त्याचे अस्तित्व गमावून बसल्यावर त्या माणसाचे काय होत असेल ? त्याच्या कुटुंबियांची मानसिकता काय असेल ? केवळ शरीराने असणे व स्वत:चे अस्तित्व टिकवून असणे यात जमीन आस्मानाचा फरक आहे आणि जेव्हा माणसाला स्वत:चे अस्तित्व हळूहळू संपुष्टात येऊन आपण केवळ जगण्यापुरते शरीराने शिल्लक आहोत ही भावना मनात येऊ लागली की काय होत असेल? त्याच्या मनाची घालमेल कशी होत असेल ? आपल्याला उठता येत नाही, नैसर्गिक शारीरिक क्रियांना, जेवण, पाणी पिणे, यासाठी सुध्दा जेव्हा माणूस दुसऱ्यावर अवलंबून राहू लागला तर किती मानसिक यातना त्याला होत असतील? असे विचार चैतन्यच्या मनात आले. निलेश त्यांच्या वडिलांबद्दल भरभरून बोलत होता. पण ते पूर्वी कसे होते आणि आज त्यांची कशी अवस्था आहे ही मनाची सल त्याच्या बोलण्यातून जाणवत होती. **(क्रमश:)**

आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...




एक उपयुक्त दागिना...!

अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध

अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
**Ph.: 2318333, Mob : 9422269394**

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक

*अटी लागू

## अमृत महोत्सव



दि.१०/१२/१९४६ ते १०/१२/२०२० तिथी ''दत्तजयंती''! प्रवासी संघ पनवेल या सामाजिक संस्थेची स्थापना दिनांक १४-१०-१९७५ ''दसरा'' या शुभ मुहुर्तावर करून गेल्या सतत ४५ वर्षांपासून निस्वार्थ-निस्पृहपणे धुरा वाहणारे आमचे सर्वांचे लाडके व सर्व प्रवासी बांधव, प्रवासी सेवा प्रशासन यांचे हितचिंतक **श्रीकांत बापट (काका)** यांचे व्यक्तिमत्व विशाल व समृद्ध आहेच. ते प्रवासी संघाचे दीपस्तंभच आहेत. मागच्या महिन्यातल्या ''दत्त जयंती'' च्या दिवशी (तिथीनुसार) त्यांनी अमृत महोत्सवी म्हणजे ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. आमच्या या काकातुल्य स्नेह्यांना उदंड दीर्घायुष्य व आयुरारोग्य लाभो! प्रवासी संघाच्या माध्यमाद्वारे प्रवाशांना उत्तरोत्तर चांगल्या प्रवासी सुविधा मिळण्यासाठी त्यांच्या हातून अविरत कार्यकर्तृत्व घडू दे! प्रवासी संघ - पनवेल - नाशिक, मध्य-पश्चिम रेल्वे व परिवहन बस सेवा प्रशासन, रेल्वे - एस.टी. सल्लागार समिती सदस्य सर्व सामाजिक व ज्येष्ठ नागरिक संघटना पनवेल-नाशिक

* * *

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ४६५ | **चैतन्य रमेश दिवेकर**<br>फ्लॅट नं. १ श्री तिरूमाला ग्लोरी अपार्टमेंट, राजीव नगर नाशिक - ४२२ ००९, मो.:७७०९४६६६०९ | २५/८/९६ | वशिष्ठ | ५'.८'' | P.G.D.M | ४०,०००/- |
| ४६६ | **संकेत माधव आवळसकर**<br>ब्राम्हण संघ बिल्डींगजवळ, विवेकानंद पथ, मु.पो. दिवेआगर ता.श्रीवर्धन जि. रायगड -४०२४०४<br>मो.:९९२१८८५२२३ / ९०७५६२५८६१ | २३/२/८६ | अत्री | ५'.१०'' | बी.ई. (मेकॅनिकल) | ३५,०००/- |
| ४६७ | **पराग अविनाश कुलकर्णी**<br>५/९ सिद्ध - गौतम हौसिंग सोसायटी, माणेकशा नगर, रविंद्र हायस्कूलजवळ, द्वारका नाशिक - ४२२०११, मो.:९९७५०१२२६६<br>फोन : ०२५३-२५९२४१६ | ११/९/८० | हरितस | ५'.२'' | बी.ए. | २०,०००/- |
| ४६८ | **समीर श्रीकांत खरे**<br>८ अमरभूपाळी अपार्टमेंट, दुसरा मजला, महात्मा नगर, नाशिक - ७<br>मो.:७६२०५९६०४५ / ९५१८९७२५४१ | ०९/९/८७ | कौशिक | ६'.२'' | बी.कॉम<br>एम.बी.ए. | २०,०००/- |
| ४६९ | **अभिषेक शैलेंद्र कुलकर्णी**<br>फ्लॅट नं. ५, मंगलमूर्ती टॉवर, जानकी विश्व, येवला नाका, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर<br>मो.: ८७८८५५३३६८, ९८२२१२६३१९ | २६/४/१९९५ | शांडिल्य | ५'.९'' | बी.बी.ए.<br>पीजीडीएम<br>मार्केटिंग | ५०,०००/- |
| ४७० | **राजेश भालचंद्र मालसे**<br>१३,गोपालनगर, सोसायटी, महादेव तलाव (पूर्व) वडोदरा, गुजरात, शास्त्रीबाग रोड.<br>मो.: ९३७५५८७००७ | १९/८/१९६७ | वत्स | ५'.७'' | आर्किटेक्चर<br>ड्राफ्टस्मन<br>आय.टी.आय. | २,००,०००/-<br>वार्षिक |
| ४७१ | **आनंद अविनाश गोडबोले**<br>सिद्धी रेसिडेन्सी, जैन स्कूलजवळ, शहानुरवाडी औरंगाबाद ४३१००५<br>मो.: ७५८८४४४१७६ | १२/१/१९८९ | कौशिक | ५'.९'' | बी.ई.<br>डिप्लोमा | ३०,०००/- |
| ४७२ | **ऋषिकेश अविनाश गोडबोले**<br>सिद्धी रेसिडेन्सी, जैन स्कूलजवळ, शहानुरवाडी औरंगाबाद ४३१००५<br>मो.: ७५८८४४४१७६ | १/७/१९९१ | कौशिक | ५'.७'' | बी.ई. | ७५,०००/- |


# भावपूर्ण श्रद्धांजली



आपल्या संस्थेचे आजीव सभासद **श्री. सुहास कृ. घारपुरे** यांचे दि. ९ सप्टेंबर २०२० रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७३ व्या वर्षी दुखद निधन झाले. ते एक संशोधक वृत्तीचे कुशल इंजिनिअर होते. १९९२ साली, मुंबईहून नाशिकमध्ये स्थलांतरित झाल्यावर त्यांनी वैद्यकिय उपकरणांची स्वत:ची कंपनी सातपूर येथील औद्योगिक वसाहतीत स्थापली व 'यूव्ही तंत्राद्वारे निर्जंतुकीकरण करणारे उपकरण त्यांनी भारतात पहिल्यांदा संशोधित केले व त्याची निर्मिती सुरु केली. त्याचबरोबर संरक्षण खात्याला लागणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची चाचणी करणारी महाराष्ट्रातील पहिली खाजगी क्षेत्रातील NABL आणि DRDO (Cemilac) मान्यताप्राप्त लॅबोरेटरीसुद्धा चालू केली. मुंबई येथील वीर रबर कंपनीमध्ये असताना भारतात पहिल्यांदा अँबेसेडर कारसाठी सायलेंट ब्लॉक बुशर विकसित केले.


त्यांना भाषेची विशेष आवड होती. ते मराठी, हिंदी, आणि इंग्रजी व्यतिरिक्त गुजराती, पंजाबी, बंगाली आणि जर्मनसह ७ भाषा अस्खलित बोलत असत आणि त्या त्या भाषा उच्चार, बोली आणि वाक्प्रचार सकट वापरण्यात त्यांची हातोटी होती. सामाजिक कार्याचीही त्यांना आवड होती. रोटरी क्लब ऑफ नाशिक (W) चे अध्यक्ष असताना आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदतीचा हात त्यांनी पुढे केला. अन्नदान, अवयवदान, नेत्रदान यांच्या प्रसारासाठी ते जाणीवपूर्वक प्रयत्नशील होते. मुंबईमध्ये असताना देखील शिवाजी पार्क नागरिक संघातर्फे होणाऱ्या उपक्रमात त्यांचा लक्षणीय सहभाग असे. त्यांच्या मागे दोन मुलगे, सून तसेच मित्र व हितचिंतकांचा मोठा परिवार आहे.

---



संस्थेचे माजी सनदी लेखापाल **श्री. रविंद्र केळकर** यांचे नुकतेच निधन झाले. अनेक वर्षे त्यांनी संस्थेचे ऑडिट चे काम अतिशय कर्तव्यदक्षपणे सांभाळले. कामाच्या बाबतीत कोणत्याही स्वरूपाची तडजोड त्यांना अजिबात चालत नसे आणि त्या बाबीकडे त्यांचा नेहमी कटाक्ष असायचा. चित्तपावन ब्राह्मण संघासोबतच अनेक संस्थांचे विश्वस्त पद ही त्यांनी भूषवले. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्याच्या आत्म्यास सद्‌गती प्रदान करो.

---



**कॅप्टन आनंद जयराम बोडस** यांचे नुकतेच काही दिवसांपूर्वी निधन झाले. शिस्तप्रिय, आदरणीय व्यक्तिमत्व. भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक, चाहते, पुरस्कर्ते, प्रचारक. समर्थ रामदास स्वामी, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि आचार्य अत्रे यांचे निस्सीम भक्त. अनेक पुस्तके, अभ्यासनीय ग्रंथ, साहित्याचे निर्माते. व्यासंग एवढा की अनेक विषयांवर साहित्याची निर्मिती त्यांनी करून ठेवली आहे. त्यापैकी, विमानगाथा, प्राचीन भारतीय विमानशास्त्र, श्री गणपती अथर्वशीर्ष आणि विज्ञान, समर्थसंदेश, नाण्याची तिसरी बाजू, आचार्य वराहमिहीर आदी विशेष प्रसिद्ध आहेत. आपल्या साहित्य संपदेतून, व्याख्यानांमधून सतत सकस वैचारिक देणं समाजाला देत राहिले. भारतीय मूल्यांच्या तेजस्वी परंपरेचं वर्णन ते आवर्जून आपल्या व्याख्यानांमधून करीत. कॅप्टन बोडस उत्कृष्ठ वैमानिक तर होतेच, शिवाय वैमानिक प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रिन्सिपॉल म्हणून अनेक वर्षे कार्यरत होते. विमान आणि विज्ञान हे त्यांचे जिज्ञासेचे विषय. प्राचीन भारतीय विमानशास्त्र, आचार्य वराहमिहिर– सहाव्या शतकातील बहूआयामी वैज्ञानिक अशा संशोधीत ग्रंथांचे त्यांनी लेखन केले आहे. २०१५ साली भारतामध्ये भरलेल्या आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदेमध्ये. Ancient Indian aviation technology या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले होते. वैमानिक म्हणून कार्यरत असताना महाराष्ट्रातील अनेक गडकिल्ल्यांचे हेलिकॉप्टरमधून दर्शन घडवण्याचा उपक्रम त्यांनी हाती घेतला होता. अनेक सुप्रसिद्ध व्यक्तींनी आणि जाणकारांनी त्यावेळी ती हवाई सफर अनुभवली होती. संस्थेच्या वतीने कॅप्टन आनंद बोडस यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

---

**आपल्या संस्थेच्या विविध उपक्रमाची माहिती संकलित करण्याच्या कामासाठी अर्धवेळ, पूर्ण वेळ होतकरू व उत्साही विद्यार्थी अथवा तरुण मदतनीस पाहिजे. योग्य मोबदला देण्यात येईल. अपेक्षेसह अर्ज संस्थेच्या कार्यालयात दाखल करणे.**

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| २१५ | **गौरी श्रीपाद डोंगरे** ४/६, वैष्णव संकुल, लॅम रोड, दत्त पेट्रोल पंप समोर, महाराजा स्टॉप, नाशिकरोड ४२२१०१ मो.: ७८७५५४८२४५ | ५/९/१९९२ | शांडिल्य | ५' | M.A. English M.A. Psychology B.Ed. | – |
| २१६ | **मैत्रेयी धनंजय दामले** सुधा बंगला, प्लॉट नं. १२, स.नं. १०२/१, शिव कॉलनी, वडाळा पाथर्डी रोड, नाशिक ४२२००९ मो.: ७७२००६५५७४, ९८२२८७६८४१ | ३/९/१९९६ | शांडिल्य | ५'.४'' | एम.एस.सी मायक्रो. | २०,०००/– |
| २१७ | **मानसी नंदकुमार बाळ** सी. ९, तिरुमला आस्था, चेतना नगर, नाशिक ४२२०१० मो.: ९८५०३१५३९४ | २१/४/१९९५ | बाभ्रव्य | ५'.३'' | बी.कॉम. | – |

## अभिनंदन



**कु. अरुंधती हेमांगिनी हेमंत धोपावकर**
इ. ८ वी स्कॉलरशिप परीक्षेत (महाराष्ट्र माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा) ६४% मार्क मिळवून उत्तीर्ण झाली. मेरिट लिस्टमध्ये आली.

**परशुराम नागरी सहकारी पत संस्थेसाठी कॅशियर कम क्लर्क महिला उमेदवार भरणे आहे. अनुभव असल्यास उत्तम. किमान पदवीधारक असणे आवश्यक आहे. गरजू उमेदवारांनी पगाराच्या अपेक्षेसह पतसंस्थेत अर्ज करावा.**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक– २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक–४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ – २५७६२४१**

प्रति, ______

**संस्थेची वेबसाईट :–**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http:\\twitter.com\nasikchitpavan
- http:\\facebook.com\nasikchitpavan
- http:\\youtube.com\user\nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.